# मेंढ्यांच्या कळपावर कोसळली वीज

## पाच मेंढ्या ठार

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि. 3 )–** अंजनगाव बारी येथील शेतकरी ज्ञानेश्वर यमगर यांच्या मालकीच्या मेंढ्यांच्या कळपावर वीज कोसळून मोठे नुकसान झाले आहे. ही घटना दि. 2 जुलै रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. यमगर यांचा गडी दहा मेंढ्यांसह गावाजवळील स्मशानभूमीच्या परिसरात चराईसाठी गेला असताना ही घटना घडली. त्यावेळी पावसासह मोठा गडगडाट सुरू होता आणि अचानक वीज कोसळली.





या अपघातात दोन मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला असून पाच मेंढ्या गंभीर जखमी झाल्या आहेत. विशेष म्हणजे या जखमी मेंढ्यांपैकी तिन मेंढ्यांचे प्राण वाचतील की नाही याबाबत अनिश्चितता आहे. या दुर्घटनेत यमगर यांचे सुमारे 60,000 रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.या घटनेनंतर ज्ञानेश्वर यमगर यांनी तात्काळ तलाठ्याकडे तक्रार केली. तलाठ्यांनी घटनास्थळी भेट देऊन मृत व जखमी मेंढ्यांचा पंचनामा केला. शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाल्यामुळे स्थानिक प्रशासनाने योग्य ती दखल घेऊन नुकसान भरपाई देणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात येत आहे.

# तहसीलदार रामदास शेळके यांची वरुड येथे बदली

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.3 ) –** शिस्तप्रिय व लोकाभिमुख अधिकारी अशी ओळख निर्माण केलेले तहसीलदार रामदास शेळके यांची वरूड येथे बदली करण्यात आली आहे. मागील दोन वर्षांपासून चांदूरबाजार येथे कार्यरत असलेल्या शेळके यांनी प्रशासनात पारदर्शकता आणि जनतेशी संवेदनशील संवाद जपत उल्लेखनीय कामगिरी बजावली.

त्यांच्या कार्यकाळात तालुक्यातील अवैध वाळू तस्करीवर त्यांनी धडक कारवाई करून कोट्यवधी रुपयांचा महसूल शासकीय तिजोरीत जमा केला. विविध आंदोलन आणि उपोषणांत सहभागी होऊन त्यांनी शेतकरी व नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या. निराधार पेन्शनप्रकरणी कॅम्प घेऊन समस्यांचे त्वरित निराकरण केले. त्यांनी पदाचा हव्यास न दाखवता कर्मचारी वर्ग व सामान्य लोकांशी आपुलकी जपली.



चांदूरबाजार हा जिल्ह्यातील पहिला तालुका ठरला, जिथे घरकुल लाभार्थ्यांना योजनेनंतर त्वरित मोफत वाळू उपलब्ध झाली. कर्मचारी निधनप्रसंगी शेळके शेवटपर्यंत उपस्थित राहिले, हे त्यांच्या मानवी दृष्टिकोनाचे उदाहरण मानले जाते. वरूड तालुका हा मध्यप्रदेश सीमेलगत असल्याने वाळू तस्करीचे केंद्र मानला जातो. यापूर्वी प्रशिक्षित आयपीएस श्रेणिक लोढा यांच्यानंतर कोणीही ठोस कारवाई केली नव्हती.

मात्र तहसीलदार शेळके यांच्या बदलीची बातमी समजताच वाळू माफियांमध्ये धडकी भरली आहे, अशी चर्चा आहे. रामदास शेळके हे पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथील शेतकरी कुटुंबातून आले आहेत. त्यांचे वडील भाऊसाहेब सीताराम शेळके हे शेतकरी असून, रामदास यांनी 2020 मध्ये एमपीएससी परीक्षेत यश मिळवून तहसीलदार पद मिळवले. यापूर्वी ते पोलीस उपनिरीक्षक, तलाठी व विक्रीकर निरीक्षक पदावरही कार्यरत होते. त्यांचा संघर्षमय प्रवास व कर्तव्यनिष्ठा आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. चांदूरबाजार मधून त्यांच्या अचानक बदलीमुळे तालुक्यात नाराजीचे वातावरण असून, नागरिक व कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या कार्यशैलीची स्तुती होत आहे.

# खा. बळवंत वानखडेंच्या वाढदिवसानिमित्त गरजू रुग्णांसाठी अन्नदान

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.3 )–** अमरावती लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार मा. बळवंतराव वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त, अमरावती शहर युवक काँग्रेस व एनएसयुआयच्या वतीने अमरावती येथे श्री संत गजानन महाराज सेवाभावी संस्था, डफरीन हॉस्पिटल, अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी गरम जेवणाचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत, खासदार बळवंतराव वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवाभावी कार्यातून उपयुक्ततेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



या कार्यक्रमाला जिल्हा काँग्रेस औद्योगिक सेलचे अध्यक्ष समीर जवंजाळ, युवक काँग्रेस प्रदेश सचिव सागर कलाने, अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, शहर काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष गुड्डू हमीद, शहर एनएसयुआय अध्यक्ष संकेत साहू यांच्यासह गणेश थावरानी, सौरभ तायडे, आकाश गेडाम, धनंजय बोबडे, शुभम बांबल, अमेय देशमुख, श्रेयस धर्माळे, प्रियल मोहोड, वेदांत केने, ओम कुबडे आदी युवक कार्यकर्ते उपस्थित होते. श्री संत गजानन महाराज सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी देखील मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले होते. उपस्थित सर्वांनी अन्नदानाच्या कार्याचे कौतुक करत, या उपक्रमामुळे रुग्णालयात दाखल रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळाल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले असून, सामाजिक जाणीव आणि मदतीचा हात देण्याची परंपरा युवक काँग्रेसने जपल्याचे चित्र दिसले.

# मांडवा येथे महाराष्ट्र कृषी दिन साजरा

**चांदूर रेल्वे –** तालुक्यातील मांडवा येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये कृषी दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विजय दवाळे (विषय तज्ञ बीआरसी)तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे समतादूत सलीम खान पठाण हे होते. तसेच मंचावर शाळेचे मुख्याध्यापक गजानन सहारे सुध्दा उपस्थित होते.



सर्वप्रथम वसंतराव नाईक यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले त्यानंतर पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे समतादूत सलीम खान के पठाण यांनी कृषी संत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कार्यावर प्रकाश टाकला तसेच शाळेचे मुख्याध्यापक गजानन सहारे यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय दवाळे यांनी विद्यार्थ्यांनी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडून प्रेरणा घेऊन आपले जीवन घडविण्याचा प्रयत्न करावा असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक भास्कर लाडे तर आभार प्रदर्शन कृष्णा पुरकाम यांनी मानले.

# तालूक्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांचा कृषी विभागातर्फे सन्मान

## पंचायत समीतीमध्ये कृषी दिन साजरा

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.3 ) –** हरीतक्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 1 जुलै रोजी कृषी दिनाचे औचित्य साधून अंजनगाव सुर्जी येथे तालुक्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांचा कृषी विभाग आणि पंचायत समितीच्या संयुक्त विद्यमाने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन पंचायत समिती सभागृहात करण्यात आले होते. तालुका कृषी अधिकारी नरेंद्र वसूकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात शेतीमध्ये नवनवीन पद्धती, प्रयोगशीलता व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भरघोस उत्पादन घेणाऱ्या महिला व पुरुष शेतकऱ्यांना सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. तसेच कृषी क्षेत्रात उत्तम सेवा देणाऱ्या कृषी सहायक स्वप्नील पुंडकर, किशोर पद्मने आणि अजित चित्रकार यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.



यावेळी उपस्थित सहाय्यक गटविकास अधिकारी कल्पना जायभाये, आत्मा अध्यक्ष निलेश घोडेराव, कृषी अधिकारी अश्विन राठोड, दिपक राऊत, सुनील सूर्यवंशी आदी मान्यवरांनी शेतकऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तालुका कृषी अधिकारी नरेंद्र वसूकर यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, शेतीतील नवनवीन प्रयोग व प्रगत तंत्रज्ञान स्वीकारून या शेतकऱ्यांनी इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे. अशा सन्मानाने इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळेल. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तालुका कृषी कार्यालय व पंचायत समितीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### सन्मानित शेतकरी

राहुल सहारे, पंकज साबळे, आशीक अन्सारी, विकी खारोळे, संजय काळमेघ, निखील वरोकार, साहेबराव राऊत, उमेश काकड, नूतन राऊत, प्रविण बोके, मंगेश बाभुळकर, कविता राऊत, लता ढोकणे, रविंद्र वानखडे यांचा समावेश होता.

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर विभागीय आयुक्तालयात ठोस चर्चा

## तत्काळ उपाययोजना करण्याचे आदेश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.3 ) –** प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आज विभागीय आयुक्तालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत विभागातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, उपसंचालक व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत आयुक्तांनी शिक्षकांच्या प्रलंबित समस्या तात्काळ मार्गी लावण्याचे स्पष्ट आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यासोबतच जिल्हा स्तरावर स्वतंत्र बैठकांचे आयोजन करून प्रश्नांची सोडवणूक करण्याचे निर्देशही देण्यात आले.

संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी या वेळी शिक्षकांच्या अनेक समस्या मांडल्या. त्यात 15 मार्च 2024 चा ग्रामीण शिक्षण मोडीत काढणारा संच मान्यता शासन निर्णय तत्काळ रद्द करणे, रिक्त पदांची भरती, पदोन्नती प्रक्रिया त्वरीत राबवणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, आदिवासी भागातील शिक्षकांना प्रोत्साहन भत्ता देणे, दिव्यांग व गंभीर आजारग्रस्त शिक्षकांची वैद्यकीय तपासणी, वैद्यकीय व वेतन देयके व्याजासह अदा करणे, अशैक्षणिक कामांपासून शिक्षकांची मुक्तता करणे, अशा अनेक महत्त्वपूर्ण मागण्यांचा समावेश होता.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या मार्गदर्शनाखाली हा लढा अधिक व्यापक होत असून, जोपर्यंत प्रश्न मार्गी लागत नाहीत तोपर्यंत लढा सुरूच राहणार, असा निर्धार ठाकरे यांनी व्यक्त केला.



### 25 पेक्षा अधिक मागण्यांवर चर्चा

या बैठकीत एकूण 25 पेक्षा अधिक मागण्यांवर सखोल चर्चा झाली. प्रहार संघटनेच्या आंदोलनामुळे विभागीय प्रशासनात हालचाल निर्माण झाली असून, अनेक मागण्या मान्य करण्याची ग्वाही प्रशासनाकडून मिळाली आहे. बैठकीला अमोल आगे, कुलदीप डंभारे, मंगेश टिकार, अमर भागवत, प्रमोद करणकार, शरद काळे, अमोल वहेकर, अमोल गोपाळ, सुधीर भुस्कुटे, संदीप बरडे, महेंद्र रोठे, देवीदास बडगे, महादेव ठाकरे आदी पदाधिकारी व सुमारे 400 शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अचलपूर तालुक्यात वनविभागाचा 'वृक्ष लागवडीचा खेळ'

## तक्रारकर्त्यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर, ( दि.3 )–** अचलपूर तालुक्यातील वनविभागाच्या वृक्ष लागवडीच्या बनवाबनवी प्रकारांवर आदिवासी पर्यावरण संघटना आणि वृक्षप्रेमींनी जोरदार आवाज उठवला आहे. झाडे लावा-झाडे जगवा या संकल्पनेला तडा जात असून, एका जागी पुन्हा पुन्हा झाडे लावून देखावा करण्याचे प्रकार सध्या गोंडवाघोली व वागडोह परिसरात सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वर्ष 2023-24 मध्ये वनपरिक्षेत्र परतवाडा अंतर्गत गोंडवाघोली व वागडोह येथे 16,000 झाडे लावण्यात आली होती, मात्र ती सर्व झाडे एका वर्षातच नष्ट झाली. त्यानंतर पुन्हा एप्रिलच्या उन्हाळ्यात झाडे लावण्यात आली, ती देखील सुकून गेली, असा आरोप आहे. त्याच जागी 3 जुलै 2025 पासून पुन्हा झाडे लावण्याचा प्रकार सुरू आहे. हे झाडे मार्डी येथील रोपवाटिकेतून दोन ट्रकमधून मागवण्यात आली आहेत.सूत्रांच्या माहितीनुसार, सीसीएफच्या नोटीसीनंतर झालेल्या 29 जून रोजीच्या 'ढाबा पार्टी'त डीएफओ पाटील यांनी आरएफओंना 'गुरुमंत्र' दिला की, तक्रारी खोट्या असल्याचे दाखवण्यासाठी त्याच ठिकाणी मोठी झाडे लागवा, आणि खर्च स्वत: करा.



या सूचनेनंतर आरएफओ वॉलके यांनी नवीन लागवड सुरू केली आहे. तक्रार देणाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असूनही, आदिवासी पर्यावरण संघटना, वृक्ष मित्र आणि नागरिक ठामपणे लढा देत आहेत. अध्यक्ष योगेश खानझोडे, सुरेश प्रजापती, प्यारेलाल प्रजापती, राजाराम कारले, संतोष भालेराव, फिरोजखान यांनी झाडांचे रक्षण करण्यासाठी दोन वर्षांपासून सतत पाठपुरावा केला आहे. या प्रकाराची तक्रार पालकमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, सीसीएफ, डीएफओ यांच्याकडे देण्यात आली असून, आरएफओ वॉलके आणि वनपाल हाते यांच्याकडून जवाब मागवण्यात आला आहे. नुकसानीची भरपाई संबंधित अधिकारी स्वत: करतील, अशी माहिती देखील समोर आली आहे.

# सात दिवसात प्राथमिक आरोग्य केंद्राचे उदघाटन करा!

## अन्यथा युवासेनेचा अंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.3 ) –** तालुक्यातील घाटलाडकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गेली दोन वर्षांपासून पूर्ण होऊनही अद्याप सुरु न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. यासंदर्भात युवा सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तालुका प्रमुख रोशन जयसिंगपूरे यांनी सात दिवसांत उदघाटन न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

घाटलाडकीसह परिसरातील हजारो लोकसंख्येच्या दृष्टीने 2017 मध्ये तत्कालीन आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्या हस्ते या केंद्राचे भूमिपूजन करण्यात आले होते. तीन कोटी रुपये खर्चून आरोग्य केंद्राची सुसज्ज इमारत बांधण्यात आली असून बांधकामास दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र अद्याप याचे अधिकृत उद्घाटन झालेले नाही,



त्यामुळे सेवा सुरू होत नसल्याचे जयसिंगपूरे यांनी निवेदनात म्हटले आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. सात दिवसांत उदघाटनाची प्रक्रिया सुरू न झाल्यास, स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात युवासेनेच्या वतीने इमारतीसमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. जयसिंगपूरे यांनी पुढे सांगितले की, हे आरोग्य केंद्र चालू झाले तर आजारी व्यक्तींना 15ङ्क20 किमी लांब जाण्याची गरज भासणार नाही. एवढ्या मोठ्या इमारतीचा वापर न झाल्याने ती दिवसेंदिवस ओसाड बनत आहे. सामान्य जनतेसाठी उभारलेल्या या सुविधा पुढाऱ्यांच्या आणि प्रशासनाच्या हलगर्जीमुळे निष्प्रभ ठरत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र वेळेत सुरु झाले नाही तर स्थानिकांनीही आंदोलनात सहभागी होण्याची तयारी दर्शवली आहे. यामुळे प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.



# नि:शुल्क महा आरोग्य शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 3 )–** जेष्ठ नागरिक प्रतिष्ठाण अमरावती, शालिनीताई मेघे हॉस्पिटल, रिसर्च सेंटर नागपूर, स्व. इंदुताई खोंडे पब्लिक चारीटेबल ट्रस्ट आणि श्री गुरूदेव लोकसेवा फाऊंडेशन अमरावती, परिवर्तन संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 5 जुलै 2025 जनसेवा दिवसानिमित्त निशुल्क महा आरोग्य शिबीर आयोजित केले आहे.

या शिबिरामध्ये हृदय रोग चिकित्सक, मेडिसिन, सर्जरी, आर्थोपेडीक, नेत्र तपासणी, दंतरोग, बालरोग, स्त्रिरोग, व्हेरीकोवेंस , ई. सी. जी. रक्तदान, न्यूरोलाजीस्ट, किडनी रोग, नाक- नाक - घसा, न्यूरोसर्जन, मेंदू शस्त्रक्रिया तपासणी करण्यात येईल. मोफत औषधी वाटप होईल. मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात येईल. राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे यांच्या संकल्पनेतून 365 दिवस 'खासदार रक्तदान' मोहीमेचा भाग म्हणून भव्य रक्तदान शिबीर शनिवार दिनांक 5 जुलै रोजी सकाळी 9 ते 3 वाजेपर्यंत आयोजित केले आहे. दहावी आणि बारावी गुणवंत विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांचा सत्कार सोहळा वेळ दुपारी 4 वाजता साईकृष्ण मंगल कार्यालय, हॉटेल रंगोली पर्ल मागे, चक्रधर नगर, नवाथे प्लाट, बडनेरा रोड, अमरावती येथे आयोजित केला आहे. असे कार्यक्रमाचे संयोजक रुग्णसेवक मंगेश दा. खोंडे यांनी कळविले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे 'आकाश नारायण सोळंके' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन - मौजे-पिंपळखुटा, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं -355 पैकी नवीन मालमत्ता क्रं. 355/A, ता. चांदूर बाजार, जिल्हा. अमरावती.

चतु: सीमा: **पूर्व**- रस्ता **पश्चिम**- रस्ता
**उत्तर**- चव्हाण यांचे घर **दक्षिण**- आमचे शिल्लक घर

सदर मिळकत नामे 'आकाश नारायण सोळंके' यांना ग्रामपंच्यायत पिंपळखुटा यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे. तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी "PIRAMAL FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता गहान/राष्ट्रीयकृत/ खाजगी/पतसंस्था/ सहकारी/इतर बँक बोजा, कुठे सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745


# तहसील कार्यालयाच्या विलंबामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर

## शिव पानंद रस्ता नऊ महिन्यांपासून अडकला लालफीतशाहीत

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.3 ) –** मोर्शी तहसील कार्यालयाच्या दुर्लक्ष व वेळकाढूपणामुळे वरला बोडणा येथील शेतकऱ्यांचे शिव पानंद रस्ता गेल्या नऊ महिन्यांपासून अडथळ्यात असून, प्रशासनाच्या टाळाटाळीमुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी रस्ता मोकळा करण्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्र प्रक्रिया पूर्ण केली असूनही, केवळ दोन शेतकऱ्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे रस्ता बंद आहे. या प्रकरणात तहसील कार्यालय केवळ आज येतो, उद्या येतो म्हणत वेळ मारून नेत आहे, असा आरोप होत आहे. राजकीय दबावाखाली काम करीत असल्याचा आरोप तहसील कार्यालयावर करण्यात येत आहे. राज्याचे महसूल मंत्री यांनी आदेश देऊनही कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. अनेक वेळा तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही.



या रस्त्याचा उपयोग शेतकऱ्यांना आपल्या शेतापर्यंत पोहोचण्यासाठी अत्यावश्यक असून, वाहतूक ठप्प झाल्याने शेतीचे नुकसान, शेतमालाचा खप आणि दैनंदिन उपजीविकेवर परिणाम झाला आहे. काही शेतकऱ्यांनी आता आत्महत्येशिवाय पर्याय उरलेला नाही अशी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. येत्या दोन दिवसात रस्ता मोकळा न झाल्यास, संबंधित पांदनरस्त्यावरच आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, या प्रकरणात जर एखाद्या शेतकऱ्याच्या जीवाला धोका झाला, तर त्यास मोर्शी तहसील कार्यालय जबाबदार असेल. या प्रकारामुळे शेतकरी वर्गात भयंकर असंतोषाचे वातावरण असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्ता मोकळा करावा, अशी मागणी होत आहे.

